# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थपित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९२

क्र. गो.वि/आस्था/५७९/२०१७ दि. : २२/२/२०१७

## परिपत्रक

**संदर्भ**:– राज्य महिला आयोग यांचे पत्र क्रं./ममआ/महा.का/२०१७/का–३/२७६, दि. १८/०२/२०१७.

विद्यापीठातील संलग्नीत सर्व महाविदयालयांना सुचित करण्यात येते की, संदर्भिय पत्रानुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने सदर कायद्याच्या अमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जाणीव जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने दि.२७/२/२०१७ रोजी आयोजीत कार्यक्रम महाविद्यालय स्तरावर कार्यशाळा घेणे अनिवार्य आहे, असे आदेश राज्य महिला आयोगाने दिलेले आहे. सदर कार्यशाळेकरिता संलग्नीत असलेल्या पत्रानुसार अदांजपत्रकाच्या अधिन राहून खर्च करणे अपेक्षीत आहे. कार्यशाळा झाल्यानंतर खर्चाची पुर्तता करुन कार्यशाळेचा खर्च व अहवाल आयोग कार्यालयास दि. ०५/३/२०१७ पूर्वी सादर करावे. तसेच अहवालाची एक प्रत विद्यापीठास सादर करावे. करिता माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादर.

**सहपत्र**:–
१.महिला आयोगाचे संदर्भिय पत्र.

(दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव(का)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

MOST URGENT

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
कलानगर, पोटमाळा, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474/2659 1980/2659 0806/2659 0878, 26591142
Website : www.mahilaayog.maharashtra.gov.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.) Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक : ममआ/महा.का./२०१७/का-३/276
दिनांक : १८/०२/२०१७

प्रति,
मा.कुलगुरु,
गोंडवाना विद्यापीठ,
जिल्हा गडचिरोली.

551 21.2.17
10806 21/2/17

विषय :- दि.२७.०२.२०१७ रोजी आपल्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांत 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ विषयी घ्यावयाच्या कार्यशाळेबाबत.

संदर्भ : - UGC Regulations २०१५(Sexual Harassment of Women employees and Student)

महोदय/महोदया,

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या 'विशाखा मार्गदर्शक तत्वे' अनुसार 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३ या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालयात महिलांच्या तक्रार निवारणासाठी 'अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती' (Internal Complaimt Committee-ICC) स्थापन करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने सदर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध विद्यापीठांमध्ये एक दिवशीय कार्यशाळा यशस्वीरित्या घेण्यात आल्या. सदर कार्यशाळेत संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, ICC अध्यक्षा, सदस्या यांना या कायद्याविषयी संपूर्ण माहिती देण्यात आली आहे.

कार्यशाळेत दिलेल्या सुचने प्रमाणे प्रत्येक महाविद्यालयाचे प्राचार्य व 'अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (ICC)' यांनी दि.२७.०२.२०१७ रोजी आपापल्या महाविद्यालयात उपरोक्त विषयी कार्यशाळा घेण्यात यावी. याकरीता प्रत्येक महाविद्यालयास रु.५०००/- वित्तीय सहाय्य देण्याचे मा.अध्यक्षा, महिला आयोग यांनी सुचित केले आहे. सदर कार्यशाळेमध्ये जाणीवजागृती अभियान

Dr. Dube DR
22/2/17
श्री. नरोटे AR
परिक्षाकार्य महाविद्यालय कक्ष
22/2/17
सौ. परधाडे
22/2

राबविण्याकरीता खालील प्रमाणे अंदाजे अंदाजपत्रकाच्या अधिन राहून खर्च करणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील | | खर्च रुपये |
|---|---|---|---|
| १. | साधन व्यक्ती मानधन | एक सत्र | ७५०/- |
| २. | चहा-बिस्किट | रु.१० X २५० = | २५००/- |
| ३. | पोस्टर्स | रु.१००X ५ = | ५००/- |
| ४. | बॅनर | रु.८००X १ = | ८००/- |
| ५. | अनुषंगिक खर्च | | ४५०/- |
| | एकूण | | ५०००/- |

सदर अभियान दि.२७.०२.२०१७ रोजी पार पाडल्यानंतर महाविद्यालयांना कार्योत्तर आर्थिक सहाय्य महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयामार्फत देण्यात येणार आहे. याकरीता महाविद्यालयांनी खालील प्रमाणे तपशीलाची पूर्तता करावी.

१. प्राचार्य यांचे सहीचे अनुदान मिळणेबाबत महिला आयोगास पत्र.
२. कार्यक्रमाचे अहवाल, फोटो (५), सीडी.
३. खर्चाची मूळ देयके
४. महाविद्यालयाचे बँक खाते क्रमांक, पत्ता व आयएफसी कोड नंबर.
५. महाविद्यालयाचे कॅन्सल चेकची झेरॉक्स प्रत.
६. उपस्थित विद्यार्थ्यांचे खालील तक्त्यानुसार मूळ नोंदणी पत्रक.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | वर्ग | ई-मेल | मोबाईल नं. | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

याकरीता महाविद्यालयांनी दि.२७.२.२०१७ रोजी कार्यशाळा झाल्यानंतर उपरोक्त तपशीलाची पूर्तता करुन कार्यशाळेचा खर्च व अहवाल आयोग कार्यालयास दि.५.३.२०१७ पूर्वी सादर करावे. तसेच **उपरोक्त कार्यशाळा घेणे महाविद्यालयांना अनिवार्य असल्याबाबत आपल्यास्तरावरुन कळवावे**, ही विनंती.

आपली,

(डॉ.मंजूषा सुभाष मोळवणे)
उपसचिव

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ..............
जावक क्र. 425 दि. 17.1.17

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आवक क्र. 215 दि. 17.1.17
जावक क्र. ..................

श्रीमती विजया रहाटकर
अध्यक्षा
(राज्यमंत्री दर्जा)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
कलानगर, पोटमाळा, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474/2659 1980/2659 0806/2659 0878, 26591142
Website : www.mahilaayog.maharashtra.gov.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.) Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक : ममआ/२०१७/मतनिस/का-३/37
दिनांक : ९/०१/२०१७

प्रति,
कुलगुरु,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

विषय :- कार्यालयांमधील अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीचे सक्षमीकरण करणेबाबत.

महोदय,

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या 'विशाखा मार्गदर्शक तत्वे' अनुसार 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३ या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालयात महिलांच्या तक्रार निवारणासाठी 'अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती' (Internal Complaimt Committee-ICC) स्थापन करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने सदर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने सर्व विद्यापीठांमध्ये एक दिवशीय कार्यशाळा घेण्याचे योजिले आहे.

२. प्रत्येक महाविद्यालयामध्ये 'अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती'(ICC) ची स्थापना झालेली आहे. परंतु या समितीचे कामकाज चालण्यासाठी समितीच्या सदस्यांना कायद्याचे तसेच समितीच्या कामकाज पध्दतीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. अस्तित्वात असणाऱ्या अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीने नि:पक्षपातीपणे काम कसे करावे ज्यामुळे तक्रारदार महिलेचे तक्रार निवारण जलदगतीने होईल हे पहाणे महत्वाचे आहे. या अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीला तिच्या क्षेत्रात दिवाणी न्यायालयाचे अधिकार आहेत. ही समिती त्या कार्यालयातील छोटीशी न्याय व्यवस्थाच असते. त्यामुळे अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीने आपले अधिकार समजून घेणे व ते वापरणे अत्यंत आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३ या कायद्यामध्ये अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती ही अंमलबजावणी प्रक्रियेतील महत्वाची यंत्रणा आहे. यास्तव या समितीचे प्रशिक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने सगळया विद्यापीठात या विषयीच्या कार्यशाळा घेण्याचे ठरविले आहे. **कृपया या विषयी आपल्याकडून कार्यवाही** करण्याकरीता एका व्यक्तीची नेमणूक करुन महाराष्ट्र राज्य महिला आयोग

कृ.मा.प.

कार्यालयास तात्काळ कळवावे जेणे करुन संपर्क व नियोजन करणे सुलभ होईल.

३. या कार्यशाळेसाठी आपल्या विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील प्रत्येक महाविद्यालयाचे प्राचार्य व अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (ICC) चे दोन प्रतिनिधींना निमंत्रित करावे. कार्यशाळेसाठी होणारा खर्च महाराष्ट्र राज्य महिला आयोग करील. सदर कार्यशाळेसाठी विद्यापीठाचा हॉल उपलब्ध करणे, स्टेज व बैठक व्यवस्था करणे, सहभागी व्यक्तींना (Participant) आमंत्रित करणे तसेच प्रत्येक महाविद्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित राहतील याची खात्री करुन घेणे ही सर्व जबाबदारी तसेच कार्यशाळांचे संपूर्ण नियोजन व नियंत्रण करण्याची जबाबदारी विद्यापीठास देण्यात येत आहे. महाविद्यालयाच्या प्रतिनिधींनी कार्यशाळेस येतांना सोबत आपल्या महाविद्यालयात कार्यरत असलेल्या अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीची प्रत संपूर्ण माहितीसह आणणे अनिवार्य आहे.

हे प्रशिक्षण म्हणजे TOT (Training of Trainers) स्वरुपाचे राहील. सदर प्रशिक्षणार्थींना आयोगामार्फत प्रमाणपत्र देण्यात येईल. कृपया सदर कार्यशाळा दि.२०.०१.२०१७ ते ०५.०२.२०१७ पर्यंत घेण्यात याव्यात. या बाबतची तारीख निश्चित करुन तसे महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयास अवगत करावे व आपल्यास्तरावर पुढील कार्यवाही तात्काळ सुरु करावी.

याबाबत पुढील आवश्यक माहितीसाठी डॉ.मंजुषा सुभाष मोळवणे, उपसचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचेशी संपर्क साधावा.

**संपर्काकरीता-** 022-26591322(कार्यालय), 9967439191 (भ्रमणध्वनी)

**ई-मेल**-1) mscwmahilaayog@gmail.com 2) manjushamolawne@gmail.com

आपली,

(विजया रहाटकर)
अध्यक्षा

प्रत,
सहसंचालक, उच्च शिक्षण (गोंडवाना विद्यापीठ )
पुढील तात्काळ कार्यवाहीस्तव.

SUNITA/Dell/DS-Internal Complent Commity for Colleges-L

C-1

दिनांक : ४/०१/२०१७

प्रति,
सदस्य सचिव,
महाराष्ट्र राज्य महिला आयोग,
वांद्रे(पू), मुंबई-४०० ०५१.

विषय :- 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३ या कायद्याबद्दल जाणीव जागृती कार्यशाळा घेणेबाबत.

मा.महोदय,

दिनांक ------------------ रोजी ---------------------- विद्यापीठात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने घेतलेल्या कार्यशाळेचा लाभ आमच्या महाविद्यालयाच्या प्रतिनिधींनी घेतला आहे.

या विषयाचे ज्ञान सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे व कायदेशीर बाबी समजाव्यात व त्यायोगे महिलांचे सक्षमीकरण व्हावे या उद्देशाने आमच्या महाविद्यालयात ही कार्यशाळा घेण्याची आमची इच्छा आहे. तरी कृपया सदर कार्यशाळा घेण्यासाठी आयोगाकडून आर्थिक सहकार्य मिळावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

प्राचार्य/ अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (ICC) सदस्य

C-2

महाराष्ट्र राज्य महिला आयोग
दिनांक : ४/०१/२०१७

**कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३ या कायद्याबद्दल जाणीव जागृती कार्यशाळा घेणेबाबत**

## नियमावली

- ५०० विद्यार्थी संख्या
- Pamplet देणे आवश्यक
- कार्यशाळेचे फोटो, सीडी, बातम्या आयोगास पाठविणे
- कार्यशाळा अर्ध्या दिवसाची असावी (Half day Workshop)
- कार्यशाळेच्या अहवालामध्ये रजिस्ट्रेशन केलेल्या विद्यार्थ्यांची नावे व सहया (उपस्थिती अहवाल) व प्रपत्रातील माहिती असावी. (सोबत प्रपत्र जोडले आहे)
- अहवालाची प्रत महाराष्ट्र राज्य महिला आयोगास आणि संबंधित विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे. (**आयोगाचा पत्ता :** महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन, पोटमाळा, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१. **ईमेल :** mscwmahilaayog@gmail.com)
- रु.२०,०००/- प्रति महाविद्यालय अहवाल प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल मात्र अहवाल दि.१मार्च,२०१७ पूर्वी सादर होणे आवश्यक.
- उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.
- देयकाच्या मूळ प्रती सादर कराव्यात.
- सोबत Banner चा format दिला आहे. Banner याच पद्धतीने तयार करावा.

C-3

<u>कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३ या कायद्याबद्दल जाणीव जागृती कार्यशाळेबाबत</u>

<u>उपस्थिती</u>

| अ.क्र. | नांव | वर्ष | सही | फोन नंबर/ मोबाईल नंबर | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

C-4

महाविद्यालयाने सादर करावयाची

माहिती

- संस्थेचे नाव :-
- महाविद्यालयाचे नाव :-
- पत्ता :-
- फोन नंबर :-
- Email ID :-
- Tan No :-
- महाविद्यालयाची नोंदणी क्रमांक :-
- Bank Account No :-
- IFSC :-
- सोबत RTGS Form :-
- One point contact
- Name :-
- Phone No :-
- कोणत्या विद्यापीठाशी संलग्नीत आहे :-

C-5

University Logo

College Logo

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई,

____________________ विद्यापीठ, व

____________________ महाविद्यालय

यांच्या संयुक्त विद्यमाने

## कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ च्या अंमलबजावणी बाबत एक दिवशीय कार्यशाळा

स्थळ :

दिनांक:

U-1

सत्यमेव जयते

University Logo

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई व

## ____________________ विद्यापीठ,

## यांच्या संयुक्त विद्यमाने

### कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ च्या अंमलबजावणी बाबत एक दिवशीय कार्यशाळा

**उद्घाटक :**

**मा.श्रीमती विजया रहाटकर**

**अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग**

**प्रमुख उपस्थिती :**

**मा.श्री.**

**कुलगुरु, विद्यापीठ**

स्थळ :

दिनांक: